Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
DOI link - https://doi.org/10.69758/GIMRJ/2408II04V12P0012

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(IV), Volume–XII

# समाजाच्या विकासासाठी महीला नतृेत्वाची गरज, भूमिका आणि आव्हाने

सहा.प्राध्यापक बळीराम मा भांगे
जोतिराव फुले समाजकार्य महाविद्यालय, उमरेड
balirambhange@gmail.com
७०५७६७१०३५

## सारांश

समाजाच्या विकासामध्ये महिलांच्या विविध क्षेत्रातील कामगीरीने विशेष भर टाकली असली, तरी विविध स्तरावर कार्यरत असणाऱ्या महीलांना त्याच्या कार्यक्षेत्रात कार्य करत असतांना, विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यांना मिळणाऱ्या सधींचा दर्जा हा महिलांचे सामाजिक नेतृत्व करण्यास भग पडतो. या विषयाचा अभ्यास आपण सर्वेक्षणात्मक करणार आहोत. समाजामध्ये महिलांना योग्य दर्जा मिळावा. महिलांकडे पाहण्याचा सामजिक दृष्टिकोण बदलावा ही उद्दिष्टे या अभ्यासात महत्वाची ठरतात. समाजाच्या विकासात महीलांची भूमिका, शैक्षणीक, सामाजीक व कौटुंबीक दृष्टया फार महत्वाची असली तरी देखिल, तिच्यापुढे येणारी आव्हाने ही कमी होत नाही, येणाऱ्या आव्हानांना तिला तोंड देण्याची क्षमता निर्माण करण्यासाठी नवनिर्मितीचे मुल्यमापन करणे गरजेचे आहे. लैंगिक असमानतेला समूळ नष्ट करून समानतेच्या विचारांचे बीजारोपण हे प्रत्येक क्षेत्रात करणे ही आजच्या काळाची गरज आहे. महिलां सक्षमीकरणासाठी समाजातील प्रत्येक घटकाला जागरूकता वाढवून त्याप्रती सहकार्य करणे आवश्यक झाले आहे.

**मुळ शब्द**, संधी, उद्दिष्टे, दृष्टिकोन, क्षमता, मूल्यमापन, समानता, बिजारोपण आणि जागरूकता

## प्रास्ताविक

स्त्री पुरूष असमानता म्हणजेच प्रत्येक क्षेत्रात महिला व पुरूषांच्या संधीमध्ये केला जाणारा भेदभाव आहे. या भेदभावाला समूळ नष्ट करण्यासाठी लैंगिक समानतलो प्राधान्य देणे गरजेचे आहे आणि हीच लैंगिक समानता आज समाजाकरिता आव्हान होऊन बसली आहे. वेळ, काळ बदलला तरी महिलांची परिस्थिती मात्र पूर्णत: बदलत नाही, तिला मिळणारा दुय्यम दर्जा हा समाजात अजूनही कायम असलेला दिसून येतो. विविध क्षेत्रांमध्ये झालेली प्रगती ही लैंगिकतेला आजही धरून असल्याचे निदर्शनात येते. तसचे कौटुंबिक दृष्टया, व्यवहारिक दृष्टया, कार्यालयीन अधिकाराच्या दृष्टिकोनातून, औद्योगिक दृष्टिकोनातून  तसचे विविध क्षेत्रातील उच्च पदांवर देखील महिलांच्या अप्रतिनिधित्वाला महिलांना सामोरे जावे लागते. तिच्या असणाऱ्या गुणांची, कौशल्याची, ज्ञानाची परवा न करता सर्रास विषमतेला स्थान दिले जाते. निश्चितच याचा सामाजिक विकासावर परिणाम घडून येतो. याचे वास्तव

जर आपल्याला जवळून पाहायचे असले तर आपण महिला प्रगतीच्या सदंर्भातील संशोधनाचे निरीक्षण करून, महिलांना असणारी आव्हाने लक्षात घेऊ शकतो व ह्या आव्हानांवर मात करण्यासाठी प्रयत्नांच्या मार्गावर वाटचाल करू शकतो. महिलांच्या नेतृत्वामध्ये त्यांच्या सक्षमीकरणांमध्ये येणाऱ्या अडथळयाची यादी, लैंगिक समानतेच्या वास्तवाशी जुळत आहे का? याची आपल्याला नोंद घेणे गरजेचे ठरेल, अर्थातच संशोधन करून, संदर्भ घेऊन, माहिती गोळा करून त्यावर विश्लेषण करणे आवश्यक आहे जणेकरून त्यामुळे आपण वास्तविकतेची पडताळणी करू शकू.

**महिला नतृेत्वाची व्याख्या**

- महिला नतृत्व म्हणजे महिलांच्या ध्येयपूर्तीसाठी विविध समाजातील व्यक्तींच्या क्रिया—प्रक्रियांचे सचांलन, मार्गदर्शन, नियंत्रण व समन्वय करणे होय.
- महिलांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी महिलांमध्ये उत्साह व शक्ती निर्माण करून तिला पूढे जाण्याच्या दृष्टीकोनातून प्रोत्साहित करणे व तिच्या सुप्त गुणांचा व क्षमतेचा योग्य उपयोग करून तिच्या भविष्याला उज्वल करणे म्हणजे महिला नेतृत्व होय.

महिला नतृेत्वाच्या संदर्भात आवश्यक घटक कौटुंबिक क्षेत्र  कौटुबिक क्षेत्रात चूल आणि मूल एवढ्याच परिघात तिला बांधले गेले होते. हळूहळू परिस्थिती बदलली आधूनिक जगात स्त्री ही कटुंबासोबत अर्थाजण करावयास घराबाहेर पडली, परंतु कौटुबिक कामे मात्र ती आपल्या पंखावर आजही पेलते आहे. कटु ुंबाच्या जबाबदारीने महिला आपल्या सर्व इच्छा आकांक्षांचा बळी देते आणि याच जबाबदाऱ्यांच्या दाबाखाली कित्येक महिला कलेक्टर, शिक्षिका, इंजिनियरद, डॉक्टर, कलावंत दबून जातात. उरते फक्त स्त्री जी फक्त दुसऱ्यांसाठी झिजत राहते, घरच्या कामांमध्ये पुरुषांचे, घरातील उतर सदस्यांचे सहकार्य असले तर महिला देखील स्वत:चा पूर्णत: विकास घडवून आणू शकते व स्वत:चा विकास घडवून आणू शकते. संशोधन व शैक्षणिक क्षेत्र  संशोधन व शैक्षणिक क्षेत्रात महिलांचे कर्तृत्व अवर्णनीय असले, तरी देखील महिलांच्या शिक्षणाला ससांर जबाबदाऱ्या यांच्या सहवासात, कुठे ना कुठे अडथळे येतात. तिला या सर्व गोष्टींमुळे शिक्षणाला मुकावे लागते तिच्या आयुष्यात अमुलाग्र बदल घडवून आणणारा शिक्षण हा महत्त्वाचा घटक आहे, हे ती जाणून असली तरी देखील तिला शिक्षणाला पूर्णविराम द्यावा लागतो. त्यामुळे तिला पाहिजे तिथे स्वत:ला सिध्द करायची स्त्रीची सधीं सहजच तिला मिळत नाही, म्हणूनच महिलांच्या शिक्षणासाठी तिला विविध क्षत्रातील अभ्यासक्रम त्याचे महत्व शिक्षणाच्या सोयी दुरस्थ शिक्षणाचे महत्त्व या सर्व गोष्टींचे ज्ञान देणे गरजेचे आहे आणि शिक्षणात स्त्रियांचा विकास करणे ही तेवढा महत्त्वाचा भाग आहे. सामाजिक व राजकीय क्षेत्र

सामाजिक व राजकीय दृष्टया महिलांचा निर्णय घेण्याच्या भुमिकेवर विचार कलो तर आपणास असे दिसून येईल की, निर्णय घेण्याच्या प्रक्रियेवर महिलांना आजही दुय्यम स्थान देण्यात आलेले आहे. समाजात राजकारणात स्त्री पुरुष समानता अजूनही तफावत दर्शवत आहे. समाजात स्त्रीचे स्थान हे राजकारणी दृष्टया ही फार महत्त्वाचे परंतु राजकारणात आजही स्त्रीला दुय्यम स्थान दिले जाते. स्त्री पुरुष समानतेला महत्त्व देण्यासाठी समाजात व राजकारणात स्त्रीचा योग्य सहभाग महत्त्वाचा आहे. राजकीय पक्ष समाज व्यवस्था या सर्वांतच महिलांचे प्रभावी नेतृत्व करणे गरजेचे आहे. तसेच महिलांच्या समस्यांवर महिलांच्या हक्कांवर आवाज उठवणाऱ्या संस्थांनी प्रभावी भूमिका

घेणे हे महत्त्वाचे आहे.

औद्यगिक क्षेत्र  महिलांसाठी रोजगाराची संधी निर्माण करण्यासाठी नवनवीन उपक्रम, त्या उपक्रमांना चालना व प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. त्यांना येणाऱ्या अडचणींचा शोध घेऊन त्यावरील उपाय योजना महत्त्वाच्या आहेत. महिलांनी मालवण्याच्या उद्योगाला लक्षात घऊन त्यांना मार्गदर्शन त्या उद्योगासाठी अनुकूनल वातावरण व आवश्यक कायदेशीर चौकट निर्माण करून दिल्यास महिलांना योग्य विकासाची गती लाभू शकते. सामाजिक सुरक्षा  महिलांच्या विकासासाठी, त्यांच्या नेतृत्वासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी, महिलांना सामाजिक सुरक्षा मिळणे अतिशय महत्त्वाची बाब आहे, सुरक्षित आणि आरामदायक वातावरण महिलांच्या मानसिक आरोग्याला प्रभावी ठरते. महिलांच्या सुरक्षिततसाठी असणारे कायदे, सुरक्षा तरतुदी या सर्वांची माहिती महिलांना गरजेचे आहे. यामध्ये बालसंगोपण सुविधा, आरोग्य सुविधा, आरोग्य सुविधा, हिंसा आणि भेदभाव या सर्वच बाबींमध्ये महिलांसाठी कायदेशीर तरतुदींचा समावेश कलेला आहे त्याची माहिती महीलांना देऊन जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे सार्वजनिक क्षेत्रात, त्यांच्या कामाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेसाठी व्यवस्थपन व मूल्यांकन करणे गरजेचे ठरते. सामाजिक विकासात महिलांच्या नेतृत्त्वाची भुमिका  विविध क्षेत्रात आणि प्रदेशांमध्ये विविध स्तरांवर महिलांना कोणत्या परिस्थितीचा सामना करावा लागतो, याची माहिती गोळा केल्याने त्यांना कोणत्या प्रकारच्या आव्हानांना तोंड द्यावे लागते आणि त्यांना कोणत्या प्रकारच्या सधी मिळतात हे कळते. ही सर्वसमावेशक माहिती देशांच्या विकासाची सखोल तलु ना करण्यास सक्षम करते, जी लैंगिक समानतेच्या दिशेने प्रगतीचे अचूक मूल्यांकन करण्यात मदत करते. अर्थात, विकास हे मानवी विकास स्थिती, उपलब्धी आणि सभांव्यतेचे मोजमाप आहे, ज्याचा उपयोग व्यक्ती, कुटुंब किंवा समुदायाच्या मानवी विकासाचे मूल्यांकन करण्यासाठी कलो जातो. हे लक्षात घेण्यासारखे आहे की जेव्हा सार्वोच्च स्थानावर बसलेली महिला निर्णय घेते तव्हो तिचा दृष्टीकोन पूर्णपणे भिन्न असतो, ज्यामुळे असे प्रभावी उपाय वेगवेगळया उद्योगांमध्ये उदयास येतात. ज्याची अपेक्षा पुरूषांकडून केली

DOI link - https://doi.org/10.69758/GIMRJ/2408II04V12P0012
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(IV), Volume–XII

जाऊ शकत नाही. शिवाय, निर्णय घेण्याच्या भूमिकेत महिलांचा अधिक सहभाग असल्यास, त्या शिक्षण आणि आरोग्यामध्ये गुंतवणुकीला प्राधान्य देतील, दर्जेदार जीवन आणि चांगले भविष्य सुनिश्चित करण्यासाठी योगदान देतील.

एकंदरीत, निष्कर्ष असा आहे की लिंग भेद प्रारंभिक तथ्ये पुढे आणतात जे केवळ महिला नतृत्वाबद्दल सखोल समपून घेण्यास मदत करत नाहीत तर महिला सक्षमीकरण किती महत्त्वाचे आहे हे देखील दर्शवतात. अशा परिस्थितीत स्त्रियांमध्ये नेतृत्व क्षमता विकसित करणारे घटक जाणून घेण्यासाठी आणि समजून घेण्यासाठी वरवरच्या उपलब्ध आकडेवारीशिवाय या दिशेने गांभीर्याने काम करण्याची गरज आहे, हे स्पष्ट आहे. या महिलांना भेडसावणाऱ्या समस्यांशी संबधित सर्वसमावेशक आकडेवारी प्राप्त झाल्यावर महिलांच्या प्रगतीतील सर्व प्रकारचे अडथळे दूर होण्यास मदत होईल, हे उघड आहे. यासह महिलांना सर्व क्षत्रात नतृत्व आणि प्रगती करण्यासाठी अनुकूल वावावरण निर्माण करण्यासाठी विशेष धोरणे आणि कार्यकम्र तयार करण्यात मदत होऊ शकते. इतकेच नाही तर या दिशेने गहन संशोधन प्रयत्नांचा एक भाग म्हणून, मोठ्या प्रमाणावर डेटा गोळा करण्यासाठी आणि त्याचे विश्लेषण करण्यासाठी एक चांगली कार्यपध्दती देखील विकसित केली जावी, जेणेकरून अधिक समावेशक लैंगिक समानता निर्देशांक विकसित करता येईल. म्हणजेच असा निर्देशांक विकसित करता येईल ज्यामध्ये जागतिक स्तरावर विविध क्षेत्रात उच्च पदावर असलेल्या महिलांसमोरील आव्हानांच` संपूर्ण विश्लेषण केले गेले आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती, डॉ.बी.आर.आंबेडकर, सुगत प्रकाशन नागपूर—१७, प्रकाशन ३ जुलै २००७

२. प्राचीन अर्वाचीन भारतीय स्त्री आणि हिंदू कोड बिल, डॉक्टर अनिल सर्यु, प्रकाशन १५ ऑक्टोंबर २०१०

३. भारतीय नारी के उध्दारक, डॉक्टर कुसुम मेघवाल, सम्यक प्रकाशन, २०१०

४. महात्मा ज्योतिबा फुले रचनावली, एल.जी.मेश्राम

५. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री, प्राध्यापक सुशील मुलजाधव, कौशल्य प्रकाशन, २७ मे २००६